!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# इंधन पाईप लाईन वाढवुन संभाजीनगरात इंधन डेपो जलदगतीने सुरु करा

## खासदार चंद्रकांत खैरे यांनी घेतली पेट्रोलियम मंत्र्यांची भेट

## पेट्रोलियम सचिवांची ऑईल कंपन्यांच्या सीएमडींशी चर्चा

### पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान व सचिव के डी त्रिपाठी यांना खासदार चंद्रकांत खैरे यांचे निवेदन

**नवी दिल्ली दि.४ –** महत्वाकांक्षी डिएमआयसी प्रकल्पाने घेतलेली गती, पंचतारांकीत शेंद्रा एमआयडीसी, संभाजीनगर परिसरातील वाढते औद्योगिकरण, ऑईल प्रोसेसिंग कंपन्यांची वाढती संख्या लक्षात घेता सध्याच्या इंधन वितरण व्यवस्थेवर ताण पडत आहे. पाणेवाडी इंधन डेपो पासुन पाईप लाईन शेंद्रा येथील डीएमआयसी प्रकल्पा पर्यंत वाढवून मराठवाडयासाठी इंधन डेपो सुरु करा अशी मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची आज दिल्ली येथे भेट घेवुन निवेदनाव्दारे केली आहे.

हिन्दुस्तान पेट्रोलियम कंपनी संभाजीनगर येथे इंधन डेपो सुरु करण्यास सहमती दर्शविली होती या संदर्भात उद्योग मंत्र्यांसोबत हिन्दुस्तान पेट्रोलियमच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक खासदार चंद्रकांत खैरे यांनी घडवुन आणली होती. त्या संदर्भात शेंद्रा एमआयडीसी व डिएमआयसी क्षेत्रात जागेचे पाहणी करुन भुसंपादनाची प्रक्रीया देखील सुरु झालेली असताना हिन्दुस्तान पेट्रोलियमचे काही अधिकारी सध्या इंधन डेपो उभारण्याची गरज नसल्याचे सांगुन इंधन डेपोच्या कामाला ब्रेक लावण्याचे काम करत असल्याचे निदर्शनास आले असल्याचे खासदार चंद्रकांत खैरे यांनी पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान व पेट्रोलियम सचिव के डी त्रिपाठी यांची दिल्ली येथे भेट घेवुन निदर्शनास आणुन दिले. त्या संदर्भात पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तिन्ही ऑईल कंपन्यांच्या सीएमडींशी चर्चा करुन संभाजीनगरच्या इंधन डेपोचा प्रश्न तात्काळ मार्गी लावु व येत्या ९ नोव्हेंबरच्या पेट्रोलियम कमिटीच्या बैठकीत यासंबंधी माहिती देवु असे आश्वासन दिले तर पेट्रोलियम सचिव के डी त्रिपाठी यांनी तिन्ही ऑईल कंपन्यांच्या सिएमडींशी चर्चा करुन या विषयात तात्काळ मार्ग काढण्याचे आदेश दिले आहे.

नांदगाव जवळील पानेवाडी येथील डेपोतील शहराला पेट्रोल व डीझेलचा पुरवठा केला जात आहे. पानेवाडी ऑईल डेपोतून इंडीयन ऑईल, हिंदुस्तान पेट्रोलियम आणि भारत पेट्रोलियम कंपन्यांच्या पेट्रोल पंपांना इंधन पुरवठा होतो. १९९२-९३ मध्ये रेल्वे स्टेशन एमआयडीसी भागात ऑईल डेपो सुरु होतो तो बंद करुन पानेवाडी ऑईल डेपोतुन इंधन खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यामुळे आता मराठवाडयातील पंप धारकांना पेट्रोल, डिझेल खरेदी साठी पानेवाडीचा लांबचा पल्ला गाठावा लागत आहे. पानेवाडीतुनच मराठवाडयासह पश्चिम महाराष्ट्रासह खान्देशातील पेट्रोल पंपांना इंधन पुरवठा केला जातो. वाहनांची संख्या वाढल्याने पानेवाडी डेपोत अनेक वेळा इंधनाचा तुटवडा जाणवतो त्यामुळे मराठवाडयात इंधन तुटवडयाला वाहन धारकांना सामोरे जावे लागत असल्याचेही खासदार चंद्रकांत खैरे यांनी पेट्रोलियम मंत्री व सचिवांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे. याविषयी खासदार चंद्रकांत खैरे यांनी अनेक वेळा पेट्रोलियम कमिटीच्या दिल्ली, मुंबई, म्हैसुर, देहरादुनच्या दौऱ्यात इंधन डेपोच्या प्रश्नाला वाचा फोडली असुन, संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड, लातुर, उस्मानाबाद, जळगाव, बुलढाणा या शहरांची कनेक्टीव्हिटी लक्षात घेवुन वाहतुक खर्चातही मोठी बचत होईल त्यामुळे इंधन डेपोच्या भुसंपादन व सुरु करण्याच्या प्रक्रीयेला गती देवुन संभाजीनगरात इंधन डेपो जलदगतीने उभारण्यात यावा अशी आग्रही मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत यांनी पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे केली आहे.

**प्रसिध्दी प्रमुख**

योगेश पायघन / गणेश वाघ

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com yp4329@gmail.com 8421415255/7769052525